Reg. No. NP CITY/236/2018-20.

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## प्राधिकृत प्रकाशन

वर्ष ८, अंक ११] गुरुवार ते बुधवार, मार्च १७-२३, २०२२/फाल्गुन २६, शके १९४३-चैत्र २, शके १९४४ [पृष्ठे ८, किंमत : रुपये १०.००

स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी प्रत्येक विभागाच्या पुरवणीला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.

## भाग एक—अमरावती विभागीय पुरवणी

अनुक्रमणिका

| | पृष्ठे |
|---|---|
| **भाग एक-शासकीय अधिसूचना :** नेमणुका, पदोन्नती, अनुपस्थितीची रजा (भाग एक-अ, चार–अ, चार-ब व चार–क यांमध्ये प्रसिद्ध करण्यात आलेले आहेत त्यांव्यतिरिक्त) केवळ अमरावती विभागाशी संबंधित असलेले नियम व आदेश. | नाही. |
| **संकीर्ण अधिसूचना :** नेमणुका इ. इ., केवळ अमरावती विभागाशी संबंधित असलेले नियम व आदेश. | १-८ |
| **भाग एक-अ.—**(भाग चार-ब यामध्ये प्रसिद्ध करण्यात आलेले आहेत त्यांव्यतिरिक्त) केवळ अमरावती विभागाशी संबंधित असलेले महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या, ग्रामपंचायती, नगरपालिका बरो, जिल्हा नगरपालिका, प्राथमिक शिक्षण व स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम याअन्वये काढण्यात आलेले आदेश व अधिसूचना. | १-१० |

## शासकीय अधिसूचना : नेमणुका, इत्यादी

नाही.

## संकीर्ण अधिसूचना : नेमणुका, इत्यादी

भाग १ (अ. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. २२८.

**जिल्हाधिकारी, यांजकडून**

**भूमि संपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना करताना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३.**

क्रमांक प्र. अ.-भू.सं.-अ. का.–कावि-२०७-२०२२.—

ज्याअर्थी, समुचित शासन असलेल्या अमरावती जिल्ह्याचा जिल्हाधिकारी यांनी भूमि संपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ (२०१३ चा ३०) (यात यापुढे ज्याचा निर्देश " उक्त अधिनियम " असा केला आहे) यांच्या कलम ११ च्या पोट-कलम (१) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून, अधिसूचना क्रमांक ७९५-२०२१, दिनांक २५-११-२०२१ अन्वये प्रारंभिक अधिसूचना काढलेली आहे आणि त्याद्वारे असे अधिसूचित केले आहे की, यासोबत जोडलेल्या अनुसूची-एकमध्ये अधिक तपशीलवार वर्णन केलेल्या जमिनीची, अनुसूची-दोनमध्ये अधिक तपशीलवार विनिर्दिष्ट केलेल्या सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यकता आहे किंवा तिची आवश्यकता भासण्याची शक्यता आहे ;

आणि ज्याअर्थी, अमरावती जिल्ह्याचा जिल्हाधिकारी यांनी कलम १५ च्या पोट-कलम (२) अन्वये दिलेला अहवाल कोणताही असल्यास, विचारात घेतल्यानंतर, उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी उक्त जमीन संपादित करण्याची आवश्यकता आहे याबाबत त्यांची खात्री पटली आहे ;

आणि म्हणून, उक्त अधिनियमाच्या कलम १९ च्या पोट-कलम (१) च्या तरतुदीन्वये उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी उक्त जमिनीची आवश्यकता आहे असे याद्वारे घोषित करण्यात येत आहे ;

आणि ज्याअर्थी, अनुसूची-तीनमध्ये अधिक तपशीलवार वर्णन केलेले क्षेत्र हे बाधित कुटुंबियांच्या पुनर्वसन व पुनर्वसाहतीच्या प्रयोजनासाठी "पुनर्वसाहत क्षेत्र" म्हणून निर्धारित केले असल्याचे याद्वारे घोषित केले असून, पुनर्वसन व पुनर्वसाहत योजनेचा सारांश अनुसूची-चारमध्ये विनिर्दिष्ट केला आहे.

आणि म्हणून, त्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम ३ च्या खंड (छ) अन्वये, समुचित शासन असलेला जिल्हाधिकारी, उक्त अधिनियमान्वये जिल्हाधिका-यांची कार्ये पार पाडण्यासाठी उपजिल्हाधिकारी (भूसंपादन), अपर वर्धा प्रकल्प लाभक्षेत्र क्र. २, जिल्हाधिकारी कार्यालय, अमरावती यास पदनिर्देशित करीत आहे.

## अनुसूची-एक

## संपादित करावयाच्या जमिनीचे वर्णन

भूसंपादन प्रकरण क्रमांक १५-४७-२०१९-२०, गाव राजुरा, तालुका चांदूर बाजार, जिल्हा अमरावती

| अनुक्रमांक (१) | सर्व्हे नंबर/गट नंबर (२) | अंदाजित क्षेत्र (३) हे. आर |
|---|---|---|
| १ | २९/१/अ | ० ८१ |
| २ | ३०/१/पैकी | १ ०० |
| ३ | ६८ पैकी | ० ९२ |
| ४ | ६८ पैकी | ० २० |
| ५ | ६८ पैकी | ० ८९ |
| ६ | ६८ पैकी | १ ४० |
| ७ | ७३/१ पैकी | ० ११ |
| ८ | ७३/१ पैकी | ० २२ |
| ९ | ७४/१ पैकी | ० ४० |
| १० | ७४/१/ड | ० ०३ |
| ११ | ७४/३ | १ ३८ |
| १२ | ७४/३ | ० ४० |
| १३ | ७४/४/अ | १ २७ |
| १४ | ७६/१ | १ ०५ |
| १५ | ७६/२ | ० ५६ |
| १६ | ७६/२/अ | ० २६ |
| १७ | ७६/३ | १ ४९ |
| १८ | ७६/४ | ० ४६ |
| १९ | ७६/४/अ | ० ४८ |
| २० | ७६/५ | ० ६८ |
| २१ | ७६/६ | ० २७ |
| | एकूण क्षेत्र .. | १४ २८ |

## अनुसूची-दोन

## सार्वजनिक प्रयोजनाच्या स्वरूपाबाबत विवरण

| | | |
|---|---|---|
| प्रकल्पाचे नाव | :— | राजुरा बृहत लघु प्रकल्प (धरण बैठक व पुच्छ कालवा) कालव्याकरीता. |
| प्रकल्प कार्याचे वर्णन | :— | राजुरा बृहत लघु प्रकल्प (धरण बैठक व पुच्छ कालवा) कालव्याकरीता. |
| सामाजिक मिळणारे लाभ | :— | राजुरा बृहत लघु प्रकल्प (धरण बैठक व पुच्छ कालवा) कालव्याच्या निर्मितीमुळे जवळपासच्या क्षेत्रात पाणी पातळीत वाढ होऊन सिंचनासाठी, पिण्यासाठी पाणी उपलब्ध होईल. तसेच मत्स्य व्यवसाय, पशुसंवर्धनामध्ये वाढ, कुटीर उद्योगास फायदा व रोजगार निर्मिती ईत्यादी ग्रामीण पायाभूत सुविधा उपलब्ध झाल्यामुळे राष्ट्रीय उत्पन्नात भर पडून शेतक-यांच्या आर्थिक स्थितीत सुधारणा होणार आहे. |

## अनुसूची-तीन

## पुनर्वसाहत क्षेत्राचे वर्णन

विस्थापन होत नसल्याने पुनर्वसाहतीची आवश्यकता नाही. सबब माहिती निरंक

## अनुसूची-चार

## पुनर्वसन व पुनर्वसाहत योजनेचा सारांश

सदर प्रकरणी घरे/कुटुंबे बाधीत होत नाहीत. सबब विस्थापन होत नसल्याने
पुनर्वसनाची व पुनर्वसाहतीची (पुनर्स्थापनेची) आवश्यकता नाही.

---

भाग १ (अ. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. २२९.

**भूमि संपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना करताना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३.**

क्रमांक प्र.अ.-भू.स.-अ.का.-कावि-२०८-२०२२.—

ज्याअर्थी, भूमि संपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना करताना वाजवी भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ (२०१३ चा ३०) यांच्या कलम ३ च्या खंड (इ) च्या परंतुकाद्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करून काढण्यात आलेली शासकीय अधिसूचना, महसूल व वन विभाग क्रमांक संकीर्ण ११-२०१४-प्र.क्र. ७७-अ-२, दिनांक १९ जानेवारी २०१५ (यात यापुढे जिचा निर्देश “ उक्त अधिसूचना ” असा करण्यात आला आहे.) याद्वारे असे अधिसूचित केले आहे की, उक्त अधिनियमाच्या कलम ३ च्या खंड (झेड-ए) मध्ये व्याख्या केलेल्या एखाद्या सार्वजनिक प्रयोजनासाठी, एखाद्या जिल्ह्यातील ५०० हेक्टर पेक्षा अधिक नसेल इतक्या क्षेत्राकरीता जमीन संपादन करण्याच्या संबंधात, अशा जिल्ह्याचा जिल्हाधिकारी हा उक्त अधिनियमाच्या प्रयोजनासाठी समुचित शासन असल्याचे मानण्यात येईल ;

आणि ज्याअर्थी, उक्त अधिसूचनेनुसार समुचित शासन असलेल्या अमरावती जिल्ह्याचा जिल्हाधिकारी यासोबत जोडलेल्या अनुसूची-एक मध्ये अधिक तपशीलवार वर्णन केलेली जमीन (यात यापुढे जिचा निर्देश “उक्त जमीन” असा करण्यात आला आहे.) सार्वजनिक प्रयोजनासाठी (यात यापुढे जिचा निर्देश “उक्त सार्वजनिक प्रयोजन” असा करण्यात आला आहे) आवश्यक आहे, अथवा तिची आवश्यकता भासण्याची शक्यता आहे, असे वाटते, ज्याच्या स्वरूपाचे विवरण यासोबत जोडलेल्या अनुसूची-दोन मध्ये दिलेले आहे.

आणि म्हणून, उक्त अधिनियमाचे कलम ११ च्या पोट-कलम (१) च्या तरतुदीन्वये याद्वारे असे अधिसूचित करण्यात येते की, उक्त जमिनीची उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यकता भासण्याची शक्यता आहे;

आणि ज्याअर्थी, प्रस्तावित भूमि संपादनाच्या अनुषंगाने बाधित व्यक्तींचे विस्थापन करण्यास भाग पाडणारी कारणे, यासोबत जोडलेल्या अनुसूची- तीन मध्ये दिलेली आहेत. (विस्थापन होणार असेल तर या अनुसूचिमध्ये कारणे नमूद करावीत) ;

आणि ज्याअर्थी, सामाजिक परिणाम निर्धारण सारांश यासोबत जोडलेल्या अनुसूची-चारमध्ये दिलेला आहे ;

आणि ज्याअर्थी, कलम ४३ च्या पोट-कलम (१) अन्वये पुनर्वसन व पुनर्वसाहत या प्रयोजनासाठी नियुक्त केलेल्या प्रशासकाचा तपशील, यासोबत जोडलेल्या अनुसूची-पाच मध्ये दिलेला आहे. (नियुक्ती करणे आवश्यक असेल तर, या अनुसूचिमध्ये तपशील नमूद करावा) ;

त्याअर्थी, आता, असे घोषित करण्यात येत आहे की, उक्त अधिनियमाच्या कलम ११ च्या पोट-कलम (४) अनुसार कोणतीही व्यक्ती ही अधिसूचना प्रसिध्द झाल्याच्या दिनांकापासून ते उक्त अधिनियमाच्या प्रकरण चार खालील कार्यवाही पूर्ण होईल त्या कालावधीपर्यंत उक्त जमिनीचा अथवा तिच्या भागाचा कोणताही व्यवहार करणार नाही किंवा उक्त जमिनीवर कोणताही भार निर्माण करणार नाही :

परंतु, उक्त जमिनीच्या अथवा तिच्या भागाच्या मालकाने अर्ज केल्यावर जिल्हाधिका-यास विशेष परिस्थितीची कारणे लेखी नमूद करून अशा मालकास उपरोक्त तरतुदीच्या प्रवर्तनातून सूट देता येईल.

परंतु आणखी असे की, जर कोणत्याही व्यक्तीने, या तरतुदीचे बुध्दीपुरस्सर उल्लंघन केल्यामुळे तिला झालेल्या कोणत्याही हानीची किंवा क्षतीची जिल्हाधिका-यांकडून भरपाई दिली जाणार नाही.

तसेच, उक्त अधिनियमाच्या कलम-११ च्या पोट-कलम (५) अनुसार जिल्हाधिकारी, भूमि संपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करतांना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क (महाराष्ट्र) नियम, २०१४ (यात यापुढे ज्यांचा निर्देश "उक्त नियम" असा करण्यात आला आहे) याच्या नियम १० च्या उप-नियम (३) द्वारे विहित केल्याप्रमाणे भूमि अभिलेखाच्या अद्ययावतीकरणाचे काम हाती घेणार असल्याचे व पूर्ण करणार असल्याचे देखील घोषित करण्यात येत आहे.

आणि म्हणून, त्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम ३ च्या खंड (छ) अन्वये समुचित शासन असलेला जिल्हाधिकारी, उक्त अधिनियमाखालील जिल्हाधिकारी यांची कार्ये पार पाडण्यासाठी उपजिल्हाधिकारी (१) भूसंपादन, अपर वर्धा प्रकल्प लाभक्षेत्र क्र. २, अमरावती यांना पदनिर्देशित करीत आहे.

## अनुसूची-एक

## जमिनीचे वर्णन

भूसंपादन प्रकरण क्रमांक १९-४७-२०१९-२०, गाव खंजिरपूर, तालुका चांदूर बाजार, जिल्हा अमरावती

| अनुक्रमांक | गट नंबर/सर्व्हे नंबर | अंदाजित क्षेत्र |
|---|---|---|
| (१) | (२) | (३) |
| | | हे. आर |
| १ | १४/१ पैकी | ० २१ |
| २ | १४/१ पैकी | ० ०६ |
| ३ | १५/१ अ पैकी | १ ३० |
| ४ | १५/१ अ पैकी | ० ३१ |
| ५ | १५/२ पैकी | ० ५८ |
| ६ | १५/२ पैकी | ० १९ |
| ७ | १५/२ ब पैकी | ० १३ |
| | एकूण क्षेत्र .. | २ ७८ |

## अनुसूची-दोन

## सार्वजनिक प्रयोजनाच्या स्वरूपाबाबत विवरण

| | | |
|---|---|---|
| प्रकल्पाचे नाव | :— | राजुरा बृहत लघु प्रकल्पाच्या वळण बंधा-याच्या धरण रेषा व बुडीत क्षेत्राच्या कामाकरिता. |
| प्रकल्प कार्याचे वर्णन | :— | राजुरा बृहत लघु प्रकल्पाच्या वळण बंधा-याच्या धरण रेषा व बुडीत क्षेत्राच्या कामाकरिता. |
| सामाजिक मिळणारे लाभ | :— | राजुरा बृहत लघु प्रकल्पाच्या वळण बंधा-याच्या धरण रेषा व बुडीत क्षेत्राच्या निर्मितीमुळे जवळपासच्या क्षेत्रात पाणी पातळीत वाढ होऊन सिंचनासाठी, पिण्यासाठी पाणी उपलब्ध होईल. तसेच मत्स्य व्यवसाय, पशुसंवर्धनामध्ये वाढ, कुटीर उद्योगास फायदा व रोजगार निर्मिती ईत्यादी ग्रामीण पायाभूत सुविधा उपलब्ध झाल्यामुळे राष्ट्रीय उत्पन्नात भर पडून शेतक-यांच्या आर्थिक स्थितीत सुधारणा होणार आहे. |

## अनुसूची-तीन

## पुनर्वसाहत क्षेत्राचे वर्णन

विस्थापन होत नसल्याने पुनर्वसाहतीची आवश्यकता नाही. सबब माहिती निरंक

## अनुसूची-चार

## पुनर्वसन व पुनर्वसाहत योजनेचा सारांश

सदर प्रकरणी घरे/कुटुंबे बाधीत होत नाहीत. सबब विस्थापन होत नसल्याने पुनर्वसनाची व पुनर्वसाहतीची (पुनर्स्थापनेची) आवश्यकता नाही.

(सामाजिक प्रभाव निर्धारण अभ्यास करणा-या अभिकरणाने दिलेला) सामाजिक प्रभाव निर्धारण सारांश : महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग ४ अ महसूल व वन विभाग, मुंबई, दिनांक १३ मार्च २०१५ मधील अधिसूचनाअन्वये सूट देण्यात आली आहे.

## अनुसूची-पाच

## नियुक्त केलेल्या प्रशासकाचा तपशील

अ. प्रशासक म्हणून नियुक्त करण्यात आलेल्या अधिका-याचे नाव, पदनाम :— प्रशासक नियुक्तीची आवश्यकता नाही.

ब. प्रशासकाच्या कार्यालयाचा पत्ता :— निरंक

क. ज्या अधिसूचनेद्वारे प्रशासकाची नियुक्ती करण्यात आली आहे त्या अधिसूचनेचा तपशील :— निरंक

**टीप** :— उक्त जमिनीच्या आराखड्याचे उपजिल्हाधिकारी (भूसंपादन), अपर वर्धा प्रकल्प लाभक्षेत्र क्रमांक २, अमरावती यांच्या कार्यालयामध्ये निरिक्षण करता येईल.

अमरावती :
दिनांक २८ फेब्रुवारी २०२२.

**पवनीत कौर,**
जिल्हाधिकारी, अमरावती.

---

भाग १ (अ. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. २३०.

**भूमि संपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना करतांना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३.**

क्रमांक-भू.सं.-कलि.-कावि-३६-२०२२.—

ज्याअर्थी, भूमि संपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ (२०१३ चा ३०) यांच्या कलम ३ च्या खंड (इ) च्या परंतुकाद्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करून काढण्यात आलेली शासकीय अधिसूचना, महसूल व वन विभाग क्रमांक संकीर्ण ११-२०१४-प्र.क्र. ७७-अ-२, दिनांक १९ जानेवारी २०१५ (यात यापुढे जिचा निर्देश "उक्त अधिसूचना" असा करण्यात आला आहे.) याद्वारे असे अधिसूचित केले आहे की, उक्त अधिनियमाच्या कलम ३ च्या खंड (झेड-अे) मध्ये व्याख्या केलेल्या एखाद्या सार्वजनिक प्रयोजनासाठी, एखाद्या जिल्ह्यातील ५०० हेक्टर पेक्षा अधिक नसेल इतक्या क्षेत्राकरीता जमीन संपादन करण्याच्या संबंधात, अशा जिल्ह्याचा जिल्हाधिकारी हा उक्त अधिनियमाच्या प्रयोजनासाठी समुचित शासन असल्याचे मानण्यात येईल ;

आणि ज्याअर्थी, उक्त अधिसूचनेनुसार समुचित शासन असलेल्या यवतमाळ जिल्ह्याचा जिल्हाधिकारी यासोबत जोडलेल्या अनुसूची-एक मध्ये अधिक तपशीलवार वर्णन केलेली जमीन (यात यापुढे जिचा निर्देश "उक्त जमीन" असा करण्यात आला आहे.) सार्वजनिक प्रयोजनासाठी (यात यापुढे ज्याचा निर्देश "उक्त सार्वजनिक प्रयोजन" असा करण्यात आला आहे) आवश्यक आहे, अथवा तिची आवश्यकता भासण्याची शक्यता आहे, असे वाटते, ज्याच्या स्वरूपाचे विवरण यासोबत जोडलेल्या अनुसूची-दोन मध्ये दिलेले आहे.

आणि म्हणून, उक्त अधिनियमाचे कलम ११ च्या पोट-कलम (१) च्या तरतुदीन्वये याद्वारे असे अधिसूचित करण्यात येते की, उक्त जमिनीची उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यकता भासण्याची शक्यता आहे;

आणि ज्याअर्थी, प्रस्तावित भूमि संपादनाच्या अनुषंगाने बाधित व्यक्तींचे विस्थापन करण्यास भाग पाडणारी कारणे, यासोबत जोडलेल्या अनुसूची-तीन मध्ये दिलेली आहेत ;

आणि ज्याअर्थी, सामाजिक परिणाम निर्धारण सारांश यासोबत जोडलेल्या अनुसूची-चार मध्ये दिलेला आहे ;

आणि ज्याअर्थी, कलम ४३ च्या पोट-कलम (१) अन्वये पुनर्वसन व पुनर्वसाहत या प्रयोजनासाठी नियुक्त केलेल्या प्रशासकाचा तपशील, यासोबत जोडलेल्या अनुसूची-पाचमध्ये दिलेला आहे ;

त्याअर्थी, आता, असे घोषित करण्यात येत आहे की, उक्त अधिनियमाच्या कलम ११ च्या पोट-कलम (४) अनुसार कोणतीही व्यक्ती ही अधिसूचना प्रसिध्द झाल्याच्या दिनांकापासून ते उक्त अधिनियमाच्या प्रकरण चार खालील कार्यवाही पूर्ण होईल त्या कालावधीपर्यंत उक्त जमिनीचा अथवा तिच्या भागाचा कोणताही व्यवहार करणार नाही किंवा उक्त जमिनीवर कोणताही भार निर्माण करणार नाही :

परंतु, उक्त जमिनीच्या अथवा तिच्या भागाच्या मालकाने अर्ज केल्यावर जिल्हाधिका-यास विशेष परिस्थितीची कारणे लेखी नमूद करून अशा मालकास उपरोक्त तरतुदीच्या प्रवर्तनातून सूट देता येईल.

परंतु आणखी असे की, जर कोणत्याही व्यक्तीने, या तरतुदीचे बुध्दीपुरस्सर उल्लंघन केल्यामुळे तिला झालेल्या कोणत्याही हानीची किंवा क्षतीची जिल्हाधिका-यांकडून भरपाई दिली जाणार नाही.

तसेच, उक्त अधिनियमाच्या कलम ११ च्या पोट-कलम (५) अनुसार जिल्हाधिकारी, भूमि संपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करतांना उचित भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क (महाराष्ट्र) नियम, २०१४ (यात यापुढे ज्यांचा निर्देश "उक्त नियम" असा करण्यात आला आहे) याच्या नियम १० च्या उप-नियम (३) द्वारे विहित केल्याप्रमाणे भूमि अभिलेखाच्या अद्ययावतीकरणाचे काम हाती घेणार असल्याचे व पूर्ण करणार असल्याचे देखील घोषित करण्यात येत आहे.

आणि म्हणून, त्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम ३ च्या खंड (छ) अन्वये समुचित शासन असलेला जिल्हाधिकारी, उक्त अधिनियमाखालील जिल्हाधिकारी यांची कार्ये पार पाडण्यासाठी उपविभगीय अधिकारी तथा भूसंपादन अधिकारी, दारव्हा, जिल्हा यवतमाळ, यांना पदनिर्देशित करीत आहे.

## अनुसूची-एक

## जमिनीचे वर्णन

भूसंपादन प्रकरण क्रमांक ०३-४७-२०२१-२२, गाव डोल्हारी, तालुका दारव्हा, जिल्हा यवतमाळ

| अनुक्रमांक | भूमापन किंवा गट क्रमांक | क्षेत्र |
|---|---|---|
| (१) | (२) | (३) |
| | | हे. आर |
| १ | ६२ | १ ०० |
| २ | ६३ | २ ३४ |
| | एकूण क्षेत्र . . | ३ ३४ |

## अनुसूची-दोन

## सार्वजनिक प्रयोजनाच्या स्वरूपाबाबत विवरण

प्रकल्पाचे नाव :— टाकळी डोल्हारी मध्यम प्रकल्प.

प्रकल्प कार्याचे वर्णन :— टाकळी डोल्हारी मध्यम प्रकल्पाचे धरण रेषेकरिता व बुडीत क्षेत्राकरिता.

समाजाला मिळणारे लाभ :— या प्रकल्पाद्वारे जमिनीस सिंचनाचा लाभ होईल.

## अनुसूची-तीन

## बाधित व्यक्तींचे विस्थापन करण्यास भाग पाडणारी कारणे

विस्थापनाची आवश्यकता नाही. सबब माहिती निरंक

## अनुसूची–चार

### पुनर्वसन व पुनर्वसाहत योजनेचा सारांश

(सामाजिक प्रभाव निर्धारण अभ्यास करणा-या अभिकरणाने दिलेला) सामाजिक प्रभाव निर्धारण सारांश : दिनांक १३ मार्च २०१५ चे राजपत्रात प्रसिद्ध महाराष्ट्र शासनाची अधिसूचना क्रमांक संकीर्ण ०१-२०१५-प्र.क्र.३-अ-२, नुसार उक्त अधिनियमाचे कलम १०(क) नुसार सामाजिक प्रभाव निर्धारणाच्या तरतुदी लागू करण्यापासून सूट देण्यात आलेली आहे.

## अनुसूची–पाच

### नियुक्त केलेल्या प्रशासकाचा तपशील

अ. प्रशासक म्हणून नियुक्त करण्यात आलेल्या अधिका-याचे नाव, पदनाम :— प्रशासक नियुक्तीची आवश्यकता नाही.

ब. प्रशासकाच्या कार्यालयाचा पत्ता :— निरंक

क. ज्या अधिसूचनेद्वारे प्रशासकाची नियुक्ती करण्यात आली आहे त्या अधिसूचनेचा तपशील :— निरंक

**टीप** :— उक्त जमिनीच्या आराखड्याचे उपविभागीय अधिकारी तथा भूसंपादन अधिकारी, दारव्हा यांच्या कार्यालयामध्ये निरिक्षण करता येईल.

यवतमाळ :
दिनांक १४ फेब्रुवारी २०२२.

**अमोल येडगे,**
जिल्हाधिकारी, यवतमाळ.

---

भाग १ (अ. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. २३१.

## जिल्हाधिकारी, यांजकडून

### अधिसूचना

क्रमांक राजस्व कक्ष ७-अ.का.-१-कावि-६४१-२०२२.—

शासकीय अधिसूचना, महसूल व वनविभाग क्र.टी.एल.सी. १०७६-६३९२३-म-६, दिनांक १ जुलै १९७६, अन्वये, महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ (१९६६ चा महा. ४१ वा) याच्या कलम ४, पोट-कलम (१) च्या परंतुकाखाली राज्य शासनास असलेल्या ज्या शक्ती मला प्रत्यायोजित करण्यात आल्या आहेत, त्यांचा वापर करुन आणि उक्त कलम ४ च्या पोट-कलम (४) द्वारे आवश्यक असल्याप्रमाणे पूर्वप्रसिद्धीनंतर कोणतेही आक्षेप वा हरकती प्राप्त झाल्या नसल्यामुळे सदर प्रस्तावातील महसुली अभिलेख्यांच्या तपासणीनंतर मी, एस, रामामूर्ती, भा.प्र.से., जिल्हाधिकारी, बुलडाणा याद्वारे दिनांक ३१ जानेवारी, २०२२ पासून बुलडाणा जिल्ह्याच्या खामगांव तालुक्यातील, खामगांव नगर परिषद हद्दीच्या बाहेर असलेल्या त्रिशंकु भागातील सोबतच्या अनुसूचीमध्ये निर्दिष्ट केलेल्या हद्दी असलेल्या व बुलडाणा जिल्ह्याच्या खामगांव तालुक्यातील “ गजानन नगरी ” या नांवाने ओळखण्यात येणा-या महसुली गांवात रूपांतर करीत आहे.

## अनुसूची

### (भूमापन क्रमांक)

मौजा गजानन नगरी, ता. खामगांव, जिल्हा बुलडाणा येथील सर्वे नंबर ७४, ७६, ७९, ८०,८१, ८२, ८३, ८४.

**नोट** : खामगांव येथील गुरे चराई, दहन/दफन भूमि, खळे किंवा मळई करीता निहित असलेल्या जमिनीचा त्याच प्रयोजनासाठी वापर करण्याचे हक्क गजानन नगरी येथील रहिवाश्यांना राहतील.

बुलडाणा :
दिनांक १६ फेब्रुवारी २०२२.

**एस. रामामुर्ती,** (भा.प्र.से),
जिल्हाधिकारी, बुलडाणा.

भाग १ (अ. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. २३२.

BY COLLECTOR

*Notification*

No. Ws-Rev-Desk-7-A.K.-1-641-2022.-----

In exercise of the powers of the State Government under the *proviso* to sub-section (*1*) of Section 4 of the Maharashtra Land Revenue Code, 1966 (Mah. XLI of 1966), delegated to me by Government Notification, Revenue and Forests Department, No. TLC-1076-63923-M-6, dated 1st July 1976, and after previous publication as required by sub-section (4) of the said Section 4, No objection were received and after due verification of records available with office. I, S. Ramamurthy I.A.S., Collector, Buldana District, with effect from the 31-01-2022, constitute the " Gajanan Nagari " in the Khamgaon taluka of the Buldana district to be a village to be called as the " Gajanan Nagari " having the limits specified in the schedule hereto appended.

SCHEDULE

**(Survey Numbers)**

Mauja Gajanan Nagari, Taluka Khamgaon, District Buldana Survey Numbers 74, 76, 79, 80,81, 82, 83, 84.

*NOTE* : Residents of " Gajanan Nagari " shall have a right over the assigned lands for grazing land, cremation ground, threshing floor *etc.* of Khamgaon for the said purpose.

Buldana : S. RAMAMURTHY, (I.A.S.),

Dated the 16th February 2022. Collector, Buldana.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT PRESS AND BOOK DEPOT, CIVIL LINES, NAGPUR-440 001 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI-400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.